पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)

Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)

☎: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००

ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०

◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉


जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/ 3277
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक :
Date : 17 OCT 2022

# परिपत्रक क्रमांक - 72

प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य/ विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलाचे संचालक यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयात शिकत असलेले विद्यार्थी त्याच्या अडचणीचे निरसन महाविद्यालय स्तरावर होत नसल्याने अडचणीचे निरसन करुन घेण्यासाठी मोठयाप्रमाणात विद्यार्थी विद्यापीठात येत आहेत. ब-याच विद्यार्थ्यांच्या किरकोळ अडचणीचे निरसन देखील त्याच्या महाविद्यालय स्तरावर होत नसल्याने असे विद्यार्थी मोठयाप्रमाणात विद्यापीठाकडे येत असल्याचे दिसून येत आहे. ही बाब तशी गंभीर स्वरुपाची असल्याने सर्व प्रथम ज्या त्या महाविद्यालयाच्या प्राचार्य महोदयांनी अशा विद्यार्थ्यांच्या अडचणी महाविद्यालय स्तरावरच सोडविणेबाबत प्रयत्न करावेत.

परंतु वरीलप्रमाणे महाविद्यालयाकडून कार्यवाही होत नसल्याने विद्यार्थी विद्यापीठ येण्याचे प्रमाण खूप जास्तीचे असल्याने त्याचा परिणाम विद्यापीठाच्या प्रशासकीय कामावर होतो आहे. ब-याचप्रमाणत प्रत्येक विद्यार्थी विद्यापीठात येत असल्याने आणि विद्यापीठ राष्ट्रीय महामार्गावर असल्याने ये-जा करीत असताना विद्यार्थ्यांला काही इजा निर्माण झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी ही विद्यार्थी ज्या महाविद्यालयात शिकत आहे त्या महाविद्यालयाच्या प्राचार्य महोदयांची राहणार आहे, याची संबंधित नोंद घ्यावी.

वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विद्यार्थ्यांची एखादी अडचण महाविद्यालय स्तरावर सोडविणे शक्य नसल्यास अशा अडचणीचा प्रस्ताव तयार करुन तो प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करावा. विद्यार्थी परीक्षा देऊन देखील विद्यार्थ्याच्या परीक्षेच्या निकालात जर Absent आले असेलतर अशा विद्यार्थ्यांच्या निकालातील Absent ची झालेली नोंद दुरुस्ती करण्याबाबत संबंधित विद्यार्थ्यांचा खालील नमून्यात प्रस्ताव प्रस्तुत विद्यापीठाकडे पाठविण्याची प्रक्रिया पुर्ण करण्यात यावी.

**Punyashlok Ahilydevi Holkar Solapur University, Solapur**

(Format for Absent Problem - March-2022)

| Sr No | Exam Centre Name | Date of Exam | Course Name | Sem | PRN | SLR Code | Paper Code | Paper Name | Seat Namber | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |

( डॉ. शिवकुमार एस. गणपूर )
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति १) प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य/ विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलाचे संचालक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर. २) संबंधित महाविद्यालयातील परीक्षार्थी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर. यास योग्य त्या कार्यवाहीस्तव व माहितीस्तव